पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

---

# वार्तापत्र

**दिनांक: ३०/०४/२०२०**

# गडचिरोली जिल्ह्यातील ११६ पोलीस अधिकारी व कर्मचारी मा. पोलीस महासंचालक पदकाने सन्मानित

- **मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे, मा. अप्पर पोलीस अधीक्षक श्री. मोहित कुमार गर्ग, मा. अप्पर पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बन्सल हे पोलीस महासंचालक पदकाने संन्मानित.**

१ मे २०२० महाराष्ट्र दिनाच्या पार्श्वभूमीवर मा. पोलीस महासंचालक यांचे कार्यालयाकडून पोलीस दलात विविध प्रकारच्या कर्तव्यामध्ये केलेल्या उत्तम कामगिरीबद्दल मा. पोलीस महासंचालक सो. यांचे सन्मानचिन्ह प्राप्त अधिकारी व कर्मचारी यांच्या नावांची यादी आज जाहीर करण्यात आली.

दरवर्षी प्रमाणे यावर्षी देखील गडचिरोली जिल्हा पोलीस दलाने या यादीत सर्वाधिक ११६ पोलीस अधिकारी कर्मचारी यांना मा. पोलीस महासंचालकांचे पदक प्राप्त झाले आहे. गडचिरोली पोलीस दलाने कोणताही अनुचित प्रकार घडू न देता पार पाडलेल्या लोकसभा व विधानसभेच्या निवडणुका, वर्षभरात उप्पगुंटी निर्मलाकुमारी ऊर्फ नर्मदा हिच्यासारख्या २२ जहाल नक्षलवाद्यांना केलेली अटक, एके-४७ सह आत्मसमर्पण करणाऱ्या जहाल नक्षली विलास कोल्हासह वर्षभरात ३५ नक्षलवाद्यांनी केलेले आत्मसमर्पण, वर्षभरात ०९ नक्षलवाद्यांचा केलेला खात्मा आणि नक्षलविरोधी लढ्यात केलेल्या इतर उल्लेखनीय व उत्कृष्ट कामगिरीमुळे या सर्व पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या कामगिरीचे कौतुक मा. पोलीस महासंचालक सो. यांनी केले आहे. या यादीमध्ये मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे सो, मा. अप्पर पोलीस अधीक्षक श्री. मोहित कुमार गर्ग सो., मा. अप्पर पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बंन्सल सो. यांचेसहीत ४ उपविभागीय पोलीस अधिकारी, ०३ सहायक पोलीस निरीक्षक, २१ पोलीस उपनिरीक्षक, ०७ सहा.फौ. आणि ७८ कर्मचारी यांचा समावेश आहे.

मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे सो. यांनी सर्व पदक प्राप्त पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे अभिनंदन केले आहे.